महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन ज्ञापन क्रमांक दुरुस्ती-०११८/प्र.क्र.४३/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक १५ जानेवारी २०१८.

विषय :- मुख्यालय, पोलीस बिनतारी संदेश, चव्हाण नगर, पुणे, येथील संगणक प्रशिक्षण केंद्र याच्या इमारतीमधील विद्युतविषयक कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ बिसंवि.पुणे-संगणक-प्र.कें.-बांधकाम/२५२/२०१७, दिनांक २३.११.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी मुख्यालय, पोलीस बिनतारी संदेश, चव्हाण नगर, पुणे, येथील संगणक प्रशिक्षण केंद्र याच्या इमारतीमधील विद्युतविषयक कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी शाखा अभियंता, श्रेणी-१, राजभवन (सा.बां.) विद्युत शाखा अभियंता, पुणे, यांनी सन २०१६-१७ च्या दरसूचीनुसार **रु.६,९३,१६६/-** इतक्या खर्चाचे अंदाज तयार केले असून ते (१) उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) उपविभाग क्रमांक १, पुणे व (२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, पुणे, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. त्या अनुसार, मुख्यालय, पोलीस बिनतारी संदेश, चव्हाण नगर, पुणे, येथील संगणक प्रशिक्षण केंद्र याच्या इमारतीमधील, उक्त खर्चाच्या अंदाजांमध्ये नमूद केलेली, विद्युतविषयक कामे करण्यासाठी **रु.६,९३,१६६/-** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

1) खर्चाचे अंदाज हे अधीक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम) प्रादेशिक विद्युत मंडल, पुणे यांच्याकडून साक्षांकित करुन घ्यावे;
2) संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांनी खर्चाचे अंदाज साक्षांकित करावे;
3) निधी उपलब्ध झाल्याशिवाय कामास सुरवात करु नये,

४. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) (*दत्तमत*) (२०५५ ०१६८), २७, लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०११६११३१३९७४२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.01.16 11:37:19 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम) प्रादेशिक विद्युत मंडल, पुणे.
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, पुणे.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).